दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले | संपादकः राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | शनिवार २ नोव्हेंबर २०२४ | अंक ३२७ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु






प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड अंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर


# १५०० रुपये देऊन नादी लावताय काय? मनोज जरांगे पाटील यांनी सत्ताधाऱ्यांना घेतलं थेट शिंगावर

## आता परिवर्तन होणार

तुम्ही शेतकऱ्यांना काय दिलं. ओबीसी, दलित, मराठ्यांना काय दिलं. ७५ वर्षापूर्वी विजेचा पोल टाकला. तो अजूनही तसाच आहे. तोही बदलला नाही. साधी कर्जमुक्तीही केली नाही. एक रुपयांचा पीक विमा गेला कुठे. हप्ते न भरल्याने पीक विमा देऊ शकत नाही असं कंपन्या म्हणतात, असा आरोप त्यांनी केला.



मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणूक 2024 पूर्वची बार उडवून दिला आहे. लोकसभा निवडणुकीत त्यांच्या आंदोलनाचा मोठा फटका सत्ताधाऱ्यांना बसला होता. आज त्यांनी अंतरवाली सराटीत बैठक घेतली त्यात दलित-मुस्लिम, मराठ्यांची एकत्रित मोट बांधण्याची घोषणा केली. त्यामुळे येत्या विधानसभेत समीकरणं बदलण्याचा दावा करण्यात येत आहे. यावेळी त्यांनी लाडकी बहीण योजनेचे नाव न घेता राज्य सरकारवर निशाणा साधला.

## आता 3 नोव्हेंबरला उमेदवार आणि मतदारसंघाची घोषणा

शेतकऱ्यांचं वाटोळं केलं. मराठा, धनगर आणि ओबीसींचं वाटोळं केलं. विरोधक नव्हते तरीही त्यांनी आमच्यावर त्यांनी वार करायला नको होतं. हिन वागणूक द्यायला नको होती. आमच्या जनतेला त्रास दिला म्हणून हा उठाव झाला. आम्ही जागांच्या लफड्यात पडणार नाही. आम्ही लोकशाही मार्गाने जाणार आहोत. आम्ही कुणाला दादागिरी करणार नाही. तुम्ही उभं राहतं तसं आम्ही उभं राहणार नाही. कोण उभा राहील कोण नाही हे आम्ही ठरवणार. आचारसंहितेचे नियम पाळून काम करायचं आहे. गरीब माणूस उभा राहत असेल तर त्याला रोखू नका. तुम्ही मतदारांपर्यंत जा. आम्ही जाणार आहोत. धमकावू नका. ३ तारखेला आम्ही उमेदवार आणि मतदारसंघ सांगणार आहोत. ४ तारखेला अर्ज मागे घेण्यात येईल. ज्यांना अर्ज मागे घ्या सांगितलं तर त्यांनी अर्ज मागे घ्यायचा. एकच उमेदवार राहील. बाकींच्यांनी स्टार प्रचारक म्हणून काम करायचं आहे, असं आवाहन त्यांनी केलं.

# शेतकऱ्यांचा केवळ निवडणुकीपुरता वापर!

पात्रुड । किसान न्युज भारताला स्वातंत्र्य मिळून ७६ वर्षे झाली, परंतु शेतकरी खरोखरचं स्वातंत्य झाला आहे का हा प्रश्न अजूनही उभा राहतो आहे. स्वतःच्या शेतात पिकवलेला शेतमालाची किंमत ठरवण्याचा अधिकार त्यास आहे का ? आजवर राजकीय पक्षांनी शेतकर्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर फक्त राजकारण करून स्वतःची पोळी भाजून घेण्याचा प्रकार केला आहे.शेतकऱ्यांचा आणि त्यांच्या मुलांचा फक्त निवडणुकीपुरता वापर करून शेतकर्यांना कायमच वाऱ्यावर सोडून देण्याचा प्रकार गेली कित्येक वर्षे सुरू असल्याची तक्रार आहे. कृषिप्रधान देशात शेतकर्यांची मोठी शोकांतिका सर्वत्र वर्तविली जात आहे. दिवसेंदिवस शेतकरी आत्महत्यांमध्ये वाढ होत आहे. सन २०२३ मध्ये एकाच वर्षात मराठवाडा व विदर्भातील सुमारे दीड हजार शेतकऱ्यांनी आत्म हत्या केल्या आहेत.देशात सर्वात जास्त आत्महत्या या पुरोगामी महाराष्ट्रात होत आहेत. राजकीय नेते याकडे डोळेझाक करून वरवरची मलमपट्टी करत आहेत. कोणत्याही प्रकारच्या ठोस उपाययोजना शेतकऱ्यांसाठी कोणतीही राजकीय मंडळी करीत नाही, ही अतिशय गंभीर बाब आहे. कोरोनाच्या दोन वर्षांच्या काळात देशाची अर्थव्यवस्था अडचणीत सापडली असताना फक्त कृषी क्षेत्राने या सावरली होती, याचाही विसर या नेत्यांना पडला आहे. सध्या सर्वच शेतमालांचा उत्पादन खर्च भरमसाठ वाढलेला आहे. असे असताना त्या तुलनेत शेतमालाला योग्य बाजारभाव मिळत नाहीत. शेतीसाठी वेळप्रसंगी उधारी किंवा कर्ज काढून खर्च करावा लागता

## शेतकऱ्यांच्या मालाला कवडीमोल भाव

बाजारात शेतमाल विक्रीसाठी नेल्यावर त्याची कवडीमोल किंमत केली जाते. शेतकर्यांची अक्षरशः सर्वत्र लुटमार चालू आहे. शेतकऱ्यांच्या आजच्या या परिस्थितीला केंद्राचे शेतमालाविषयी आयात निर्यात धोरण कारणीभूत असल्याची ओरड होत आहे. युवा पिढीचा शेतीवरील विश्वास उडत चालला आहे. असेच चालू राहिल्यास भविष्यात शेती कसायला कोणीही धजावणार नाही. याकडे केंद्र सरकारसह राज्य शासनाने तातडीने दखल घेऊन योग्य कार्यवाही होणे गरजेचे आहे.









# डबल नेमचा खेळ कुणाचा करणार गेम? अनेक मतदारसंघात सारख्या नावाचा प्रयोग, बिघडवणार गणित?




महाराष्ट्रात एकाच टप्प्यात विधानसभा निवडणूक होत आहे. या निवडणुकीसाठी 8 हजारांहून अधिक उमेदवारांनी अर्ज दाखल केला आहे. यामधील 7,994 उमेदवारांचे अर्ज छाननीनंतर वैध ठरले आहे. राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी 20 नोव्हेंबर रोजी मतदान होईल. पण आता या निवडणुकीत एक नवीन ट्विस्ट आला आहे. राज्यात विधानसभेच्या निवडणुकीत पाडापाडीसाठी आतापासूनच अनेक राजकीय पक्षांनी पडद्यामागून डावपेच आखले आहे. आता डाव टाकून मतदानावेळी उमदेवाराला पेचात टाकण्याचे काम करण्यात येणार आहे. डबल नेमचा गेम कोणत्या उमेदवाराचं गणित बिघडवेल हे निकालानंतर समोर येईल.

तर 4 जागांवर मविआतीलच उमेदवार एकमेकांच्या आमने-सामने आहेत.

आता उमेदवारांचे देव पाण्यात

राज्यातील अनेक मतदारसंघात उमेदवारांचे देव सध्या पाण्यात आहेत. कारण त्यांच्या नामसदृश्य काही उमेदवारांनी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे एकाच नावाचे दोन-दोन, तीन-तीन उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे ठाकणार आहेत. आता ज्या मतदारसंघात उमेदवार अर्ज मागे घेतील. तेथील उमेदवार सुटकेचा निश्वास टाकतील. तर इतर ठिकाणी या सारख्या नावामुळे मतदारांचा गोंधळ उडण्याची शक्यता आहे. पक्षीय चिन्हं समोर असले तरी नाम साधार्म्यामुळे गुलिगत धोका होण्याची दाट शक्यता आहे.

# जगाला हेवा वाटावा, असे लक्ष्मीपूजन!




गडचिरोली: दि.01 नोव्हेंबर 2024

स्थानिक शहरातील रामनगर वॉर्डात राहणाऱ्या कृष्णकुमार निकोडे आणि परिवाराने काल लक्ष्मीपूजनाच्या दिवशी “प.पू.गुरुदेव हरदेव कृपानिवास या स्वगृही अनोख्या लक्ष्मीपूजनाचे आयोजन केले होते. त्याप्रमाणे महिला हेच लक्ष्मीचे साकार व शाश्वत रूप समजून दोघींचा आदर सत्कार करण्यात आला. खरे लक्ष्मीपूजन आपण केल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर झळकत होता.

दर सणासुदीला गडचिरोली येथे येऊन निकोडे बापलेकांना गोडधोड करून खावू घालणाऱ्या कृष्णकुमार निकोडे यांच्या देलोडा (बुज.) येथील सासूबाई अहिल्याबाई गुरनूले आणि धुणे-भांडी करणाऱ्या कामवाल्या बाई रामनगर येथीलच भावनाताई भानारकर यांना निकोडे परिवाराने दोन दिवसापूर्वीच लक्ष्मीपूजनाच्या दिवशीच्या जेवणाचे आमंत्रण दिले होते. काल शुक्रवार, दि.०१ नोव्हेंबरला सकाळी ९.०० वा. दोन्ही माऊल्या आल्यावर दोघींनाही सुसज्जित आसनावर बसविण्यात आले. कृष्णकुमार निकोडे आणि दुर्वांकुर निकोडे या बापलेकांनी दोन्ही माऊल्यांचे पवित्र चरण प्रक्षाळून पाद्यपूजा करत पुष्पांजली अर्पण केली. तद्नंतर दोघींनाही नवी साडीचोळी भेट देऊन चरणस्पर्श वंदन केले. यावेळी वैष्णव भानारकर, नाशिकेत गुरनूले उपस्थित होते. आजवर असे लक्ष्मीपूजन कोणीही केले नसल्याची चर्चा पंचक्रोशीत होत आहे.

प्रतिक्रिया व्यक्त करतांना समाजसेवक, कवी व लेखक कृष्णकुमार निकोडे म्हणाले, “आपल्या संत निरंकारी मिशनच्या मानवताधर्मानुसार कोणीच उच्च-नीच नाही, सर्व एकाच ईश्वराची लेकरे आहोत. स्त्री ही नारायणी-लक्ष्मी तर पुरुष हा नारायण-विष्णू आहे. उत्तम सेवा कार्य करणाऱ्या व्यक्तीचे हात व पायही सदैव पावन असतात, म्हणून अशाप्रकारे आपण पुरुष महिलांचा व महिला पुरुषांचा आदर-सत्कार, मान-सन्मान करू लागलो तर बालिका, माता आणि भगिनींवरील अन्याय-अत्याचार, हिंसाचार थोड्याफार प्रमाणात का होईना कमी होतील, अशी एक सार्थ अपेक्षा आहे.” सर्वांचे जेवण आटोपल्यावर दुर्वांकुर निकोडे यांनी आभार मानले.

# शारदीय नवरात्र उत्सव

यादेवीसर्वभूतेषुशक्ति-रूपेणसंस्थिता।
नमस्तस्यै नमस्तस्यै
नमस्तस्यै नमो नमः॥

भारतीय संस्कृतीमध्ये अनेक सण उत्सव अगदी भक्तिभावाने साजरे केले जातात जसे की गणेश उत्सव, दिवाळी, गुढीपाडवा, मकर संक्रांती इत्यादी. त्यापैकीच एक उत्सव म्हणजे शारदीय नवरात्र उत्सव होय. शारदीय नवरात्र उत्सव आश्विन महिन्यातील शुक्ल पक्षात प्रतिपदा तिथीपासून ते नवमी पर्यंत म्हणजेच नऊ दिवस हा उत्सव भक्तिमय वातावरणात साजरा केला जातो. नवरात्र उत्सवामध्ये देवी मातेची आराधना केली जाते, हा उत्सव भारतामध्ये विविध ठिकाणी वैविध्यपूर्णतेने साजरा केला जातो, या नऊ दिवसांमध्ये देवीच्या नऊ रूपांची आराधना केली जाते. देवी मातेचे विविध रूपे आहेत ज्यामध्ये शैलपुत्री, ब्रह्मचारिणी, चंद्रघंटा, कृष्मांडा, स्कंदमाता, कात्यायनी, कालरात्री, महागौरी, सिध्दीदात्री इत्यादी रूपांमध्ये देवीमातेचे वास्तव्य नऊ दिवस बघायला मिळते, या दिवसांमध्ये देवीची आराधना म्हणून व्रत देखील केले जाते आणि देवीमातेची मनोभावे पूजा केली जाते. आश्विन शुद्ध प्रतिपदेच्या म्हणजेच नवरात्रीच्या पहिल्या दिवशी घरोघरी घट बसविण्यात येतात, परडीमध्ये माती घेऊन त्यामध्ये नऊ वेगवेगळ्या धान्यांची पेरणी केली जाते आणि मातीमध्ये घट बसविण्यात येतो त्यावर आंब्याची पाच पाने ठेवून वरती श्रीफळ ठेवून घटाची मनोभावे पूजा केली जाते, या पहिल्या दिवसास घटस्थापना म्हणून संबोधले जाते. घटाभोवती पेरलेल्या धान्यास दिवसेंदिवस अंकुर फुटतात, आणि त्या सोबतच घरामध्ये भक्तिमय वातावरण पसरले जाते. नवरात्रीच्या नऊ दिवस देवीला नऊ वेगवेगळ्या रंगांच्या साड्या नेसवतात, घटास रोज वेगवेगळ्या फुलांची माळ अर्पण केली जाते तसेच घटस्थापनेच्या दिवसापासून घटाभोवती एक दिवा अखंड तेवत ठेवण्यात येतो जो संपूर्ण नऊ दिवस घरातील अंधार दूर करून देवी मातेच्या सहवासाने भक्तांच्या आयुष्याला प्रकाशित करत असतो. नवरात्र उत्सवाच्या नऊ दिवसांमध्ये देवीच्या धार्मिक स्थळांवर भक्तांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ बघायला मिळते, लाखो भाविक देवी मातेच्या चरणी आशीर्वाद घेण्यासाठी गर्दी करतात. त्याच प्रमाणे सार्वजनिक मंडळांमध्ये देखील देवीच्या मूर्तीची स्थापना तसेच घटस्थापना केली जाते आणि नऊ दिवस गरबा नृत्य तसेच वेगवेगळे सांस्कृतिक कार्यक्रम सादरीकरण यांचे मंडळांमध्ये नियोजन केले जाते, ज्या गोष्टीला आज भाविकांकडून देखील चांगला प्रतिसाद बघायला मिळतोय, मनोरंजनाचा भाग वगळता इतरही भक्तिमय आणि संस्कृतीला साजेसे कार्यक्रम आणि देखावे या वेळी सादर केले जातात आणि पारंपरिक उत्सव देखील त्या मधून जोपासण्या साठी सार्वजनिक मंडळ प्रयत्न करतात.

देवी मातेला महिषासुर मर्दिनी देखील म्हणतात त्या मागील कथा अशी की महिषासुर नावाचा राक्षस याने तप करून ब्रह्मदेवास प्रसन्न केले, ब्रह्मदेवाने वर मागायला सांगितला असता महिषासुराने मला अमरत्व प्राप्त व्हावे म्हणून मागणी केली. ब्रह्मदेवाने समजावले की या सृष्टीमध्ये जन्म घेणाऱ्या प्रत्येक जीवास मरण हे निश्चित आहे म्हणून तू मागितलेला वर मी तुला देऊ शकत नाही, म्हणून महिषासुर ने मला एका स्त्रीच्या हातून मरण यावे असा वर मागितला कारण त्याला माहित होते की अशी कोणी स्त्री अस्तित्वात नाही, आणि त्याला तसा वर ब्रम्हदेवांनी दिला देखील. नंतर महिषासुर राक्षसाने आपल्याला मिळालेल्या शक्तीचा वापर करून तिन्ही लोकांवर आपले साम्राज्य प्रस्थापित केले तसेच लोकांवर आत्याचार देखील त्याने सुरू केले, हे बघून सर्व देव इंद्रदेवास घेऊन ब्रह्मदेवांकडे गेले आणि सर्व कहाणी सांगितली, त्यावेळी ब्रह्मदेवाने महिषासुरास मारण्यासाठी एका शक्तीला प्रकट केले आणि ती शक्ती म्हणजे देवी महिषासुर मर्दिनी. देवीला सर्व देवांनी आपली आयुधे दिली विष्णू देवांनी चक्र तर शिवशंकर भगवंतांनी त्रिशूळ देवीस प्रधान केली. देवीने पुढे महिषासुरच्या साम्राज्यावर चाल केली तेव्हा महिषासुरने विविध रूपं घेऊन देवी सोबत युद्ध केली परंतु तो विजय मिळवू शकला नाही शेवटी त्याने रेड्याचे रूप घेऊन देवीवर हल्ला केला असता देवीने आपल्या त्रिशुळणे महिषासुर चा वध केला. आणि तेव्हा पासून देवीस महिषासुर मर्दिनी म्हणून संबोधले जाते. नवरात्रीचा शेवटचा दहावा दिवस म्हणजे आश्विन शुद्ध दशमी दसरा, ज्यास विजयाचा दिवस विजयादशमी देखील म्हटले जाते कारण याच दिवशी प्रभू श्रीरामांनी रावणाचा पराभव केला होता, म्हणून या दिवशी रावणाच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन देखील केले जाते. असा हा नवरात्रीचा उत्सव प्रत्येक वर्षी झेंडूच्या फुलांच्या सुवासात आपट्याच्या पानांना सोबतीला घेऊन वडीलधारांच्या आशीर्वादाने हा भक्तिमय नवरात्र उत्सव साजरा केला जातो..

कवी योगेश तुळशीराम जाधव
तळेगाव मळे, कोपरगाव
अहिल्यादेवीनगर.




# आला अश्विन अश्विन...

वर्षा ऋतू संपत जातो...तोच शरद ऋतूचे आगमन होते... शरद ऋतूचा प्रारंभ अश्विन महिन्याच्या सुरुवातीनेच होत असतो...वर्षा ऋतू मधील ओलाव्याच्या संजीवक स्पर्शाने कायापालट होते... तसेच ऋतूपालटही होतच असतो.. यामुळे सृष्टीत अल्हाददायक बदल घडून येतात... ह्या स्पर्शाचे मनमोहक दृश्य म्हणजेच अश्विन महिना... काळ्या आईची उदारता अंथरलेली असते सारीकडे.. त्यावर निळ्या आभाळाची निळी नवलाई सर्व दूर उमटते.. ती जलदांमधून .. अजून कुठेतरी बळीराजाच्या कष्टाचा शिडकाव उमटत असतो... सर्व ऋतूंची आपापसात ऋणानुबंध जोडले जातात... त्याप्रमाणे निसर्ग देखील सृष्टीचे पांग फेडत असतो... तोही कृतकृत्य होतो.. अश्विन मासात.. या मासातील नजारा बघितल्यावर शरद ऋतुराजाचे बदलते रूप अजून बरेच काही सांगू लागते... कुठून तरी लाल पिवळे झेंडू अलगद डोकावू लागतात हिरवळीतून... या पिवळ केशरीं पुष्प गोळ्यांची उधळण साऱ्या रानांमधून सुगंधाच्या स्वरूपात होऊ लागते..आणि वाऱ्याच्या वेगात तेही स्पर्श करू लागतात...सारीकडे सुगंध दरवळू लागतो रानवाऱ्याच्या रुपात.... घरांच्या लाकडी चौकटीतल्या दारावर तोरणाच्या माळेत गुंफून राहण्यासाठी तेही आपली उदारता दाखवतातच... दाराचे रूप पालटण्यासाठी आणि विविध सण उत्सवांच्या स्वागतासाठी . हीच सुमने येतात नाविन्याने..आश्विन मास म्हणजेच सण-उत्सवांचे दिन.. नवनव्या उषःकाल नवनवीन नजारे घेऊन भेट देण्यास येत असते नवी पहाट..रांगोळींनी सुशोभित अंगण सज्ज होतात आपली संस्कृती जपण्यासाठी.... या दिवसांची आरास सारीकडे पसरू लागते... त्यातून अश्विन मासाची किमया दिसू लागते..

सौ शुभांगी माळी नाशिक

# आठवलेंची नाराजी दूर, देवेंद्र फडणवीसांकडून मिळालं मोठं आश्वासन!

राज्यात विधानसभेचं बिगूल वाजलं आहे, जागा वाटप होऊन उमेदवारी अर्ज देखील दाखल झाले आहेत. आता प्रचारात रंगत आली आहे, मात्र तरी देखील महायुती आणि महाविकास आघाडीमधील काही घटक पक्षांमध्ये जागा वाटपावरून अजूनही नाराजी दिसून येते आहे. याचा फटका हा निवडणुकीत बसू शकतो त्यामुळे बड्या पक्षांकडून मित्र पक्षांच्या मनधरणीचा प्रयत्न सुरू असल्याचं पाहायला मिळत आहे. दरम्यान महायुतीचा मित्र पक्ष असलेल्या आरपीआयला राज्यात केवळ एकच जागा मिळाली आहे. यावर आता पक्षाचे अध्यक्ष रामदास आठवले यांनी प्रतिक्रिया दिली आहे. नेमकं काय म्हणाले आठवले?

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका जाहीर झाल्या आहेत. महायुती आणि महाविकास आघाडी असा संघर्ष असला तरी ही निवडणूक महायुतीसाठी अत्यंत सोपी आहे. लोकसभेला महाराष्ट्रात नरेटीवमुळे आमचं मोठं नुकसान झालं. तरी लोकसभेला आम्हाला झालेलं मतदान हे मोठं आहे. महायुतीला विधानसभेत 170 पर्यंत जागा मिळतील. आरपीआयला एकच जागा मिळाल्यामुळे कार्यकर्त्यांमधे नाराजी होती, मात्र मी ती दूर केली आहे. विधानसभेला जरी एक जागा असेल तरी आम्हाला एक विधानपरिषद आणि सत्ता आल्यावर मंत्रिपद देण्याचं आश्वासन फडणवीस आणि शिंदे यांनी दिल्याचा दावा आठवले यांनी केला आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, महायुतीचे 17 उमेदवार लोकसभेला जिंकले त्यात आमच्या पक्षाची मतं देखील आहेत. दरम्यान शिवसेना ठाकरे गटाचे नेते अरविंद सावंत यांनी भाजप उमेदवार शायना एनसी यांच्याविरोधात वादग्रस्त वक्तव्य केल्याचा आरोप करण्यात येत आहे. यावर देखील आठवले यांनी प्रतिक्रिया दिली आहे. अरविंद सावंत हे तसे चांगलं कल्चर



असलेले खासदार आहेत, शायना एनसी यांना माल म्हणणे ही गंभीर बाब आहे. त्यांचा अपमान म्हणजे सगळ्या महिलांचा अपमान आहे. उद्धव ठाकरे यांनी अरविंद सावंत यांच्यावर कारवाई करावी. सोबतच महिला आयोगाने देखील याची दखल घेऊन कारवाई करावी, अशी मागणी आठवले यांनी केली आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार २ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# मी तुमची माल नाही साहेब; महिला आहे

# उद्धव ठाकरेंचं नाव घेत शायना एन. सी. यांचा अरविंद सावंतांवर घणाघात

ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत यांनी केलेल्या वक्तव्याप्रकरणी शिवसेनेच्या मुंबादेवी मतदारसंघाच्या उमेदवार शायना एन. सी. यांनी मुंबईच्या नागपाडा पोलीस ठाण्यात जावून तक्रार केली. यानंतर त्यांनी पोलीस ठाण्याबाहेर प्रसारमाध्यांना प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांनी अरविंद सावंत यांच्यावर सडकून टीका केली. "ही एफआयआरची कॉपी आहे. ही महाविनाश आघाडी महिलांचा सन्मान करत नाही. देशभरात आज लक्ष्मीपूजन आहे. शुभ मूहूर्त आहे. पण अरविंद सावंत काय म्हणतात? तुम्ही इम्पोर्टेड माल आहात. माल म्हणजे आयटम. मला सार्वजनिक जीवनात आतापर्यंत 20 वर्षे झाले. तुम्ही सर्व जाणता की, मी किती निष्ठेने काम केलं आहे. मुंबादेवीचे आशीर्वाद आहेत. मी महिला आहे पण माल नाही", असं शायना एन. सी. म्हणाल्या. "आमच्यासारखे प्रोफेशनल महिला, सक्षम महिला किंवा कोणतीही महिला, त्यांच्याप्रती तुम्ही अभद्र टीका करणार असाल तर ही एफआयर आणि कायदा आपलं काम करेल. जेव्हा एखाद्या महिलाबद्दल तुम्ही अभद्र वक्तव्य करतात तेव्हा तुम्ही तिचा अवमान करतात. तुम्हाला वाटतं प्रत्येक महिला शांत राहणार. पण



ही महाराष्ट्राची महिला उत्तर देणार", असं प्रत्युत्तर शायना एन. सी. यांनी अरविंद सावंत यांना दिलं.

'मी कुणाची माल नाही' "एकीकडे आमचे मुख्यमंत्री एकनाथ शिदे आहेत, ज्यांनी राज्यातील लाडक्या बहिणींसाठी किती गोष्टी केल्या, आणि दुसरीकडे आहेत अरविंद सावंत ज्यांनी 2019 आणि 2014 च्या लोकसभा निवडणुकीत आमच्यासारख्या महिलांना लाडकी बहीण म्हटलं. आमच्यासारख्या महिलांकडून प्रचार करुन घेतला. त्यासोबतच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावाचा वापर करुन घेतला. आता म्हणतात की, मी इंपोर्टेड माल आहे. मी फक्त एवढंच सांगेन, मी मुंबईची मुलगी आहे. मुंबादेवीचा आशीर्वाद आहे. पण मी कुणाची माल नाही", असं शायना एन. सी. म्हणाल्या.

## 'मी तुमची माल नाही साहेब'



"अरविंद सावंत यांच्या वक्तव्यावर ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे, खासदार संजय राऊत, राष्ट्रवादी एसपी गटाचे प्रमुख शरद पवार शांत आहेत, काँग्रेसचे नाना पटोले शांत आहेत, पण महाराष्ट्र आणि मुंबईची महिला शांत राहणार नाही. हे एफआयअार माझं उत्तर आहे. एकीकडे सांगतात की, तुम्ही इम्पोर्टेड माल आहात. कशासाठी? तुम्हाला चर्चा करायची असेल तर चर्चा करा, बोलायचं असेल तर बोला. आई मुंबादेवीचे रक्षक आणि आशीर्वादासोबत आम्ही हे काम करणार. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे नेहमीच महिलांचा सन्मान करतात. उद्धव ठाकरे अरविंद सावंत यांच्या वक्तव्यावर काहीच बोलत नाही. अरविंद सावंत म्हणतात, इम्पोर्टेड माल, मी तुमची माल नाही साहेब, आई मुंबादेवी आमची रक्षक आहे. मुंबादेवीची महिला तुम्हाला प्रत्युत्तर देणार", असं शायना एन. सी. म्हणल्या

# माजलगाव चा आमदार, रमेश आडसकर च होणार - प्रा. शिदुतात्या राठोड



माजलगाव :- गेल्या 7 वर्षांपासून माजलगाव मतदारसंघात थांबून वेगवेगळ्या प्रकारच्या कार्यक्रम, सुख दुःखात जाऊन, माजलगाव च्या प्रत्येक माणसाला आपलासा वाटणारा माणूस म्हणजे रमेश आडसकर. यांच्या कडे जाण्यासाठी कोणत्याही प्रकारची ओळख लागत नाही, भेट झाली म्हणजे सर्वसामान्य माणसाचं काम झालं च समजा, अशा प्रकारचा कामाचा निपटारा या ठिकाणी होतो. तरुणाई ला तर आडसकर साहेबांचे प्रचंड प्रमाणात आकर्षण वाढलेले आहे. प्रत्येकाला हवाहवासा वाटणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे साहेब. पक्षाने उमेदवारी नाकारली म्हणजे खचून न जाता कार्यकर्त्यांचा उत्साह पाहून तेवढ्याच ताकतीने ते निवडणूक लढणार आहेत आणि जिंकणार सुद्धा आहेत यामध्ये तिळमात्र शंका नव्हे.



साहेबांच्या बाबतीत जे गलिच्छ राजकारण करण्यात आले, त्याचा वचपा सर्व माजलगाव मतदारसंघातील जनता येणाऱ्या 20 तारखेला मतदानाच्या माध्यमातून दाखवून देणारच आहे. मतदारसंघात घरोघरी, प्रत्येक ठिकाणी फक्त आणि फक्त आडसकर साहेबांच्या नावाची च चर्चा आहे.

# परीट समाजाचे अनुसुचित जात आरक्षणाचे भिजत घोंगडे कधी सुटणार

परीट/धोबी समाजाचा नेहमी प्रत्येक निवडणुकीत केवळ मतांसाठीच वापर होतो का ? असा सवाल भाजपचे कार्यकर्ते असलेले परीट/धोबी समाज तथा डेबुजी युथ ब्रिगेड महाराष्ट्र प्रदेश संयोजक श्री.दादासाहेब नन्नवरे यांनी उपस्थित केला आहे. त्यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्रात जवळ जवळ ४५ ते ५० लाखांच्या आसपास परीट/धोबी समाजाची लोकसंख्या आहे.समाजाचे बरेच नेते विविध राजकीय पक्षांमध्ये आहेत. काही जण प्रमुख पदाधिकारी आहेत. खासदार,नगरसेवक,अशी जबाबदारी सुध्दा समाजाचे कार्यकर्ते पार पाडत आहेत. तरीही पक्षनेतृत्व त्यांचा विचार करत नाही ही फार मोठी शोकांतिका आहे.महाराष्ट्रात ठिकठिकाणी मोठमोठे मेळावे आयोजित केले जातात व राजकीय नेते येऊन फक्त बोलबच्चन आश्वासने देतात.पण परीट समाजाला कोणताही राजकीय पक्ष ताकद देऊ शकत नाही का,असा सवाल डेबुजी युथ ब्रिगेड महाराष्ट्र प्रदेश संयोजक यांच्यासह प्रदेश सचिव मोहन राऊत,शंकर व्यवहारे, गणेश नन्नवरे,महादेव नन्नवरे,राम काळे, श्रीकांत जाधव,विकास व्यवहारे,विलास जाधव,सतिष मुळे,बाबू भालेकर,राजेंद्र मोताळे,संजय वाघमारे,सोमनाथ नन्नवरे, दत्ता नन्नवरे,शहादेव नन्नवरे,ज्ञानेश्वर राऊत,परमेश्वर राऊत,प्रदिप वाघमारे, नवनाथ राऊत,आदींनी उपस्थित केला आह

## सामान्य जनता आणि युवकच मोहन जगताप यांना आमदार करणार : झोडगे

माजलगाव मतदार संघातील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार म्हणून शेतकरी ऊसतोडकामगार कष्टकरी युवकांचे नेते भावी आमदार मोहन बाजीराव जगताप हे सर्वसामान्य जनतेच्या मना त आपलं वाटणारं नेतृत्व आहे त्यांना युवक आणि सामान्य जनताच आमदार करीत असा विश्वास.वडवणी तालुक्यातील युवा नेते,समदीप सामाजिक प्रतिष्ठानचे विष्णूबाळ झोडगे यांनी व्यक्त केला.गेल्या दशकापासून सामान्य जनतेच्या कष्टकरी कामगार आणि ऊसतोड कामगारांच्या हक्काच्या लढाईसाठी सदैव तत्पर राहणारे मराठा आरक्षणाच्या लढाईमध्ये संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या आरक्षण लढ्यात सदैव सामील होऊन आरक्षणाचा तिढा सुटावा यासाठी सकारात्मक भूमिका असलेले,माजलगाव तालुक्यातील वडवणी,धारूर, माजलगाव विधानसभा मतदारसंघातील सामान्य जनतेच्या ऊसतोड कामगारांच्या प्रश्नावर सदैव मानसात राहून काम करणाऱ्या मोहन दादा जगताप यांना सामान्य जनताच तुतारी या चिन्हावर मतदान करून प्रचंड मताने विजयी करेल. असा विश्वास वडवणी तालुक्यातील युवा नेते तथा सामाजिक कार्यकर्ते समदीप सामाजिक प्रतिष्ठानचे विष्णूबाळ झोडगे यांनी विश्वास व्यक्त केला



# माझी लढाई प्रस्थापिताच्या विरोधात समाजाचा शब्द माझ्यासाठी अंतिम : दत्ता वाकसे

माजलगाव विधानसभा मतदार संघाची रणधुमाळी चालू असून कडाकड्यात थंडीतही गरम वातावरण झालेला आहे माजलगाव विधानसभा मतदारसंघांमध्ये प्रस्थापित लोकांनी राज्य केलेला आहे प्रस्थापित लोकांचा राज्य उलटून टाकण्यासाठी मी जनतेच्या दरबारामध्ये उतरलो आहे असे भावनिक आव्हान आणि साद माजलगाव विधानसभा मतदारसंघाच्या पक्ष उमेदवार दत्ता वाकसे यांनी घातली आहे यावेळी मतदारसंघातील विविध गावांमध्ये संवाद दौरा गाठीभेटी चालू केला असून मतदारसंघांमध्ये असलेल्या समाजाच्या भावना शेतकऱ्यांच्या भावना शेतमजुराच्या भावना दिनदलित कष्टकर यांच्या भावना. समजून घेत आहे त्यांचे प्रश्न समजून घेत आहे त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी मला मताच्या माध्यमातून आशीर्वाद द्यावे असे आवाहनही मतदारराजाला करत आहे माजलगाव मतदारसंघामध्ये रस्त्याची अवस्था अतिशय दयनीय झालेली आहे शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे लक्ष दिले जात नाही कामगारांच्या प्रश्नाकडे लक्ष दिले जात नाही माजलगाव मतदारसंघ हा. विकासापासून कोशोधूर आहे विकास शोधायचा कुठे?अशी अवस्था या मतदारसंघातील जनतेची झालेली आहे त्यामुळे माझ्यासारख्या सर्वसामान्य शेतकऱ्या मुलाला आमदार करा मी विकासाची गंगा आपल्या पायावर आणून ठेवल्याशिवाय स्वस्त बसणार नाही आरक्षणाचे प्रश्न



आहेत त्याचबरोबर बेरोजगारीचे प्रश्न आहेत बेरोजगारीचे प्रश्न सोडवण्यासाठी मी कार्यतत्पर आहे समाजाच्या विविध प्रश्नासाठी मी आंदोलन मोर्चा केलेले आहेत समाजाच्या हक्कासाठी माझा संघर्ष हा कायम राहिलेला आहे त्यामुळे मला समाजाने मताच्या माध्यमातून आशीर्वाद द्यावे असे आवाहनही केले यावेळी यावेळी चेअरमन नारायण शेळके,महादेव नरवटे. नागोराव नरवटे,. राजाभाऊ नरवटे. गोविंद नरवटे(पैलवान). त्याचबरोबर ग्रामस्थ युवक मोठ्या संख्येने उपस्थित होत

# माजलगावनंतर धारूर_वडवणीतही मोहनराव जगताप यांचा करिष्मा

## अनेकांनी केला राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश

माजलगाव : महाविकास आघाडीकडून तुतारी चिन्ह घेऊन आलेले राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार मोहनराव जगताप यांची घोडदौड जोरदार सुरु असून माजलगाव नंतर त्यांनी धारूर वडवणीतही आपला करिष्मा दाखवण्यास सुरुवात केली आहे. आज धारूर वडवणी तालुक्यातील जैतापूर, लोणवळ तसेच माजलगाव तालुक्यातील शेलापूरी येथील शेकडो युवकांनी मोहनराव जगताप यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश केला.

जैतापूर (ता. धारूर) येथील कैलास रघुनाथ घोगरे, मा. सरपंच नारायण रंगनाथ मोरे, संतोष नारायण माने, शाम रामभाऊ माने,



बबन भगवान घोगरे, रतन व्यंकटी माने, ज्ञानदेव बाळासाहेब घोगरे, आकाश संजय घोगरे यांनी तर लोणवळ (ता. वडवणी) येथील



केशव तेलगड, कृष्णा मोरे, रामेश्वर मोरे, ज्ञानेश्वर भिसे यांनी प्रवेश केला. सोबतच माजलगाव तालुक्यातील शेलापुरी येथील किशोर जाधव, सुनील घडसे, बालासाहेब घडसे, भारत घडसे, दीपक घडसे, नितीन घडसे, राहुल घडसे, अनंत घडसे, कृष्णा घडसे, शरद घडसे, सचिन मोरे, प्रकाश घडसे, गोविंद जाधव, आकाश जाधव, नितीन घडसे आदींनी आज पक्षात दाखल होत मोहनराव जगताप यांना विजयी करण्याचा संकल्प केला.

यावेळी मोहनराव जगताप यांच्या सोबत विधानसभा प्रमुख नारायण अण्णा डक, ज्येष्ठ नेते दयानंद स्वामी, प्रा. श्रीहरी काळे,विश्वंभर थावरे,नरवडे साहेब, उद्धवराव धुमाळ, राहुल काका जगताप, बबन थावरा पवार, श्रीकृष्ण सोळंके, भालचंद्र सोळंके अविनाश गोंडे, गणेश रांजवण,संतोष यादव, शरद यादव, ईश्वर होके, प्रवीण तिडके, गोविंद इतापे, सरपंच अंगद कटके, प्रकाश चव्हाण सह पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जगताप यांच्या विजयाचा संकल्प

जैतापूर, लोणवळ व शेलापुरी येथील युवकानी प्रवेश करताच मोहन जगताप यांना प्रचंड बहुमतांनी विजयी करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त केला.
































हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com